लोकमत

## देवानंद शिंदे : डी. आर. माने महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण, अद्ययावत प्रयोगशाळेचे उद्‌घाटन

# महिन्याचा 'नेटपॅक' हा सकारात्मक आत्मविश्वासच

लोकमत न्यूज नेटवर्क

**कागल :** विद्यार्थ्यांनी कधीही नकारात्मक भाव घेऊन जगू नये. महिन्याचा नेटपॅक आणि रात्री झोपताना लावलेला गजर हा आपल्या जगण्यातील सकारात्मक आत्मविश्वासच असतो. आयुष्यात अनेक पराभव झाले तरी काही बिघडणार नाही; पण मानसिकदृष्ट्या पराभूत होऊ नका, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

येथील डी. आर. माने महाविद्यालयाच्यावतीने आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा आणि अद्ययावत प्रयोगशाळेच्या उद्‌घाटन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी



**कागल येथील डी. आर. माने महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात कुलगुरु डॉ देवानंद शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य प्रविण चौगुले, जिल्हा बँकेचे सतीश माने, भय्या माने, सुनील माने, बिपीन माने आदी उपस्थित होते.**

सिनेट सदस्य भैया माने होते. यावेळी पोलीस उपाधीक्षक सतीश माने, डॉ. डी. आर. मोरे, उपनगराध्यक्षा नूतन गाडेकर, सुनील माने, बिपीन माने, बी. जी. कुलकर्णी प्रमुख उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, तसेच सतीश माने, कागल नगरपालिकेचे प्रवीण काळबर, नितीन कांबळे यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. देवानंद शिंदे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांवर विश्वास ठेवावा. कारण तुमच्या भल्यासाठी पूर्णवेळ काम करणारे फक्त पालकच असतात. प्राचार्य प्रवीण चौगुले यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रपती पारितोषिक विजेते सतीश माने म्हणाले की, यश मिळवायचे असेल तर गुणवत्तेवर विश्वास ठेवा.

यावेळी भैया माने यांचेही भाषण झाले. वनमित्र संस्थेच्यावतीने कुलगुरुंना गडकोट किल्ले संदर्भात निवेदन देण्यात आले. स्वागत जिमखाना प्रमुख श्रीनिवास पाटील, सूत्रसंचालन डॉ. निला जोशी, तर बी. आर. पाटील यांनी आभार मानले.

### नेमक्या जागेत नेटका संसार...

**डॉ. देवानंद शिंदे म्हणाले की, राजर्षी शाहूंचा पदस्पर्श लाभलेले आणि डी. आर. माने, वाय. डी. माने यांची महान परंपरा लाभलेले हे शैक्षणिक संकुल आहे. अवघ्या ३० गुंठे जागेत नेमकेपणाने शैक्षणिक संसार थाटला आहे. चार हजार विद्यार्थ्यांमध्ये ७० टक्के मुली आहेत. प्राचार्य प्रवीण चौगुले आणि सचिव भैया माने यांचे हे कौशल्य कौतुकास्पद आहे.**

सकाळ

# जहाँगीरनगर विद्यापीठाशी शिवाजी विद्यापीठाचा करार



कोल्हापूर : बांगलादेशच्या जहाँगीरनगर विद्यापीठाशी सामंजस्य करारावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्यासमवेत डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर.के. कामत, डॉ. ए.एम. गुरव, डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. के.डी. सोनवणे, डॉ. अनिल घुले, डॉ. माधव भिलावे आदी.

कोल्हापूर, ता. ११ : 'जैविक शास्त्रांच्या संशोधनात भारतातील आघाडीच्या विद्यापीठांपैकी असलेल्या शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य कराराद्वारे सहकार्य वृद्धी ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. त्याचा बांगलादेशच्या संशोधक विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होईल,' अशी भावना ढाका (बांगलादेश) येथील जहाँगीरनगर विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान व जनुकीय अभियांत्रिकी अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल यांनी आज येथे व्यक्त केली.

दोन्ही विद्यापीठांत आज शैक्षणिक व संशोधकीय देवाण-घेवाणीच्या अनुषंगाने सामंजस्य करार झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. शोहेल यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. डॉ. शोहेल म्हणाले, "शिवाजी विद्यापीठाचा जैवतंत्रज्ञान, तसेच सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभाग हे आधुनिक संशोधनामध्ये अग्रेसर आहेत. त्याचप्रमाणे जहाँगीरनगर विद्यापीठाचा बांगलादेशमध्ये बायोसेफ्टी व सिक्युरीटी, मॉलेक्युलर बायोटेक्नॉलॉजी या विषयांच्या संशोधनात मोठा लौकिक आहे. या दोन संस्थांनी परस्पर सहकार्यातून संयुक्त संशोधन प्रकल्पांसह फॅकल्टी-स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रॅम असे विविध उपक्रम राबविल्यास या क्षेत्रात भरीव स्वरूपाचे संशोधनकार्य करता येईल.'' यावेळी विद्यापीठाच्या इनक्युबेशन, इनोव्हेशन व लिंकेजीस कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत, आंतरराष्ट्रीय कक्षाचे संचालक डॉ. ए. व्ही. घुले यांनी शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीविषयी अवगत केले.

विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे समन्वयक डॉ. के. डी. सोनवणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर प्राणीशास्त्र अधिविभागाचे डॉ. माधव भिलावे यांनी आभार मानले. अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

**शैक्षणिक आदान-प्रदानास चालना**

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, "सामंजस्य करार केवळ दोन विद्यापीठांच्याच नव्हे, तर दोन्ही देशांच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा प्रकारच्या सामंजस्य करारांतून भारतीय उपखंडातील संशोधन व शैक्षणिक आदान प्रदानास चालना मिळणे ही सौहार्द वृद्धीच्या दृष्टीने अतिशय चांगली बाब आहे. केवळ या विषयांच्याच नव्हे, तर अन्य विद्याशाखांच्या संशोधक, शिक्षक, विद्यार्थ्यांत ज्ञानाचे आदान-प्रदान होणे आवश्यक आहे.''

पुढारी



कोल्हापूर : बांगलादेशच्या जहाँगीरनगर विद्यापीठाशी सामंजस्य करारप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमवेत डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. अनिल घुले, डॉ. माधव भिलावे आदी.

# बांगलादेशच्या विद्यार्थ्यांना लाभ

## डॉ. शोहेल; शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जैविक शास्त्रांच्या संशोधनात भारतात आघाडीवर असलेल्या शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य कराराद्वारे सहकार्य वृद्धी ही महत्त्वाची बाब आहे. बांगलादेशच्या संशोधक, विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल, अशी भावना बांगलादेशमधील ढाका येथील जहाँगीरनगर विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान व जनुकीय अभियांत्रिकी अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल यांनी व्यक्त केली.

ढाका (बांगलादेश) येथील जहाँगीरनगर विद्यापीठ शिवाजी विद्यापीठ यांच्यात शैक्षणिक व संशोधकीय देवाण-घेवाणीच्या अनुषंगाने सामंजस्य करारप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. शोहेल यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. डॉ. शोहेल म्हणाले, विद्यापीठाचा जैवतंत्रज्ञान, सूक्ष्म जीवशास्त्र अधिविभाग हे आधुनिक संशोधनामध्ये अग्रेसर आहेत. जहाँगीरनगर विद्यापीठाचा बांगलादेशमध्ये बायोसेफ्टी व सिक्युरिटी, मॉलेक्युलर बायोटेक्नॉलॉजी या विषयांच्या संशोधनात लौकिक आहे. या दोन संस्थांनी परस्पर सहकार्यातून संयुक्त संशोधन प्रकल्पांसह फॅकल्टी-स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रॅम अशा प्रकारचे विविध उपक्रम राबविल्यास या क्षेत्रात भरीव संशोधन करता येईल.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सामंजस्य करार केवळ दोन विद्यापीठांच्याच नव्हे, तर दोन्ही देशांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. सामंजस्य करारातून भारतीय उपखंडातील संशोधन व शैक्षणिक आदान-प्रदानास चालना मिळणे, ही चांगली गोष्ट आहे. यावेळी विद्यापीठाच्या इनक्युबेशन, इनोव्हेशन व लिंकेजीस कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत, आंतरराष्ट्रीय कक्षाचे संचालक डॉ. ए. व्ही. घुले यांनी शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीविषयी अवगत केले. सूक्ष्म जीवशास्त्र विभागाचे समन्वयक डॉ. के. डी. सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. प्राणिशास्त्र अधिविभागाचे डॉ. माधव भिलावे यांनी आभार मानले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, वनस्पतिशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते.

लोकमत

# सामंजस्य कराराचा बांगलादेशी संशोधकांना लाभ

## अब्दुल्ला शोहेल : शैक्षणिक, संशोधकीय देवाण-घेवाण होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जैविक शास्त्रांच्या संशोधनात भारतातील आघाडीच्या विद्यापीठांपैकी एक शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य कराराद्वारे सहकार्य वृद्धी ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. त्याचा बांगलादेशच्या संशोधक, विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होईल, असे प्रतिपादन ढाका येथील जहाँगीरनगर विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान व जनुकीय अभियांत्रिकी अधिविभागाचे प्रमुख प्रा. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल यांनी सोमवारी केले.

जहाँगीरनगर विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात शैक्षणिक व संशोधकीय देवाणघेवाणीच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. शोहेल यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठ आणि जहाँगीरनगर विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार झाला. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल यांच्यात करारपत्रांचे आदानप्रदान झाले. यावेळी विलास नांदवडेकर, आर. के. कामत, ए. एम. गुरव, डी. के. गायकवाड, के. डी. सोनवणे, अनिल घुले, माधव भिलावे, आदी उपस्थित होते.

### संशोधनाला चालना

कार्यक्रमात प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, हा सामंजस्य करार केवळ दोन विद्यापीठांच्याच नव्हे, तर दोन्ही देशांच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा प्रकारच्या सामंजस्य करारांतून भारतीय उपखंडातील संशोधन व शैक्षणिक आदान प्रदानास चालना मिळणे ही सौहार्द वृद्धीच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

डॉ. शोहेल म्हणाले, या दोन संस्थांनी परस्पर सहकार्यातून संयुक्त संशोधन प्रकल्पांसह फॅकल्टी-स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रॅम, अशा प्रकारचे ि उपक्रम राबविल्यास या क्षेत्रात भरीव स्वरूपाचे संशोधनकार्य करता येईल.

या कार्यक्रमास वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, वनस्पतीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. डी. के. गायकवाड, आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या इनक्युबेशन, इनोव्हेशन व लिंकेजीस कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत, डॉ. ए. व्ही. घुले यांनी माहिती दिली. डॉ. के. डी. सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. माधव भिलावे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2019
पुण्यनगरी



कोल्हापूर : बांगलादेशच्या जहाँगीरनगर विद्यापीठाशी सामंजस्य करारप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमवेत डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत, डॉ. ए. एम. गुरव व इतर. (छाया : एस. अली)

# कराराचा बांगलादेश विद्यार्थ्यांना लाभ

## डॉ. अब्दुल्ला शोहेल : शिवाजी विद्यापीठातर्फे कुलसचिवांची सही

कोल्हापूर / प्रतिनिधी :
जैविक शास्त्रांच्या संशोधनात भारतातील आघाडीच्या विद्यापीठांपैकी असलेल्या शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य कराराद्वारे सहकार्य वृद्धी ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. त्याचा बांगलादेशच्या संशोधक, विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होईल, अशी भावना बांगलादेशमधील ढाका येथील जहाँगीरनगर विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान व जनुकीय अभियांत्रिकी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल यांनी व्यक्त केली.

ढाका (बांगलादेश) येथील जहाँगीरनगर विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात सोमवारी शैक्षणिक व संशोधकीय देवाण-घेवाणीच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. शोहेल यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या.

डॉ. शोहेल म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा जैवतंत्रज्ञान, सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभाग हे आधुनिक संशोधनामध्ये अग्रेसर आहेत. जहाँगीरनगर विद्यापीठाचा बांगलादेशमध्ये बायोसेफ्टी व सिक्युरिटी, मॉलेक्युलर बायोटेक्नॉलॉजी या विषयांच्या संशोधनात मोठा लौकिक आहे. या दोन संस्थांनी परस्पर सहकार्यातून संयुक्त संशोधन प्रकल्पांसह फॅकल्टी-स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रॅम अशा प्रकारचे विविध उपक्रम राबविल्यास या क्षेत्रात भरीव स्वरूपाचे संशोधनकार्य करता येईल.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, हा सामंजस्य करार केवळ दोन विद्यापीठांच्याच नव्हे, तर दोन्ही देशांच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा प्रकारच्या सामंजस्य करारांतून भारतीय उपखंडातील संशोधन व शैक्षणिक आदान प्रदानास चालना मिळणे ही सौहार्द वृद्धीच्या दृष्टीने अतिशय चांगली बाब आहे. केवळ या विषयांच्याच नव्हे, तर अन्य विद्याशाखांच्या संशोधक, शिक्षक, विद्यार्थ्यांत ज्ञानाचे आदान-प्रदान होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांच्या तज्ज्ञांच्या संमिश्र शिष्टमंडळाने ढाका येथे जाऊन सहकार्य संधींचा वेध घ्यावा. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठात बांगलादेशच्या शिक्षकांसाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रमही आयोजित करावा, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यापीठाच्या इनक्युबेशन, इनोव्हेशन व लिंकेजीस कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत, आंतरराष्ट्रीय कक्षाचे संचालक डॉ. ए. व्ही. घुले यांनी शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीविषयी अवगत केले. सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे समन्वयक डॉ. के. डी. सोनवणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्राणिशास्त्र अधिविभागाचे डॉ. माधव भिलावे यांनी आभार मानले. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, वनस्पतीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

पुढारी

# कमी खर्चातील ऊर्जानिर्मिती ही संशोधनातील संधी : डॉ. भोजे

## वारणा महाविद्यालयात 'ऊर्जा, पर्यावरण विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद

**वारणानगर : प्रतिनिधी**

गोरगरिबांना परवडेल, अशी कमी खर्चातील ऊर्जेची निर्मिती हीच संशोधनातील मोठी संधी आणि संशोधकांना पुढील आव्हान आहे. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत ऊर्जेची निर्मिती करताना पर्यावरणाचे जतन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन थोर शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. शिवराम भोजे यांनी येथे गुरुवारी बोलताना केले.




**वारणानगर : आंतरराष्ट्रीय परिषदेत देश-विदेशातील संशोधकांच्या संग्रहित शोधनिबंधाच्या सीडीच्या अनावरणप्रसंगी अणुशास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. शिवराम भोजे, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, डॉ. प्रवीण सप्तर्षी, डॉ. वासंती रासम.**

वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयांमध्ये ऊर्जा, पर्यावरण आणि संशोधनातील नीतिमत्ता' या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली. त्यावेळी डॉ. भोजे बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ज्येष्ठ पर्यावरण विषयाचे संशोधक डॉ. प्रवीण सप्तर्षी (अमेरिका), डॉ. एन. पी. पाटील (धारवाड), डॉ. पी. एस.पाटील कोल्हापूर, वारणा शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, व वारणा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या परिषदेसाठी देश-विदेशातून सुमारे २७० हून अधिक संशोधकांनी विविध विषयांवरील आपले संशोधन सादर केले. पाहुण्यांचा परिचय संयोजक प्रा.एम.जी.चिखलकर यांनी करून दिला. डॉ.डी.टी.शिर्के यांनीही मार्गदर्शन केले. परिषदेत 'पर्यावरण' या विषयावर सॅलिसबर्ग विद्यापीठ, अमेरिका येथील निमंत्रित प्रोफेसर डॉ. प्रवीण सप्तर्षी यांनी मार्गदर्शन केले. 'संशोधनातील नीतिमत्ता' या विषयावर कर्नाटक विद्यापीठ येथील प्राध्यासर नागप्पा शहापूर यांनी तर 'ऊर्जा' या विषयावर शिवाजी विद्यापीठातील विज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्राध्यापक पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रा. एम. जी. चिकलकर, सचिव डॉ. बी. एस. शिर्के, डॉ. यू. बी. चिकुर्डेकर, डॉ. एस. वाय. जाधव, एस. एन. गोलगिरे, डॉ.पी.एस. राऊत, आदी उपस्थित होते.

सकाळ

# ‘एमबीए’ प्रवेश परीक्षेमुळे सवलती

## डॉ. सुजय खाडिलकर यांची माहिती

कोल्हापूर, ता. ११ : ‘एमबीए’च्या प्रवेशासाठी ‘डीटीई’ची प्रवेश परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख १५ फेब्रुवारी ही असून, ‘एमबीए’ करू इच्छिणाऱ्या सर्वांनी ही परीक्षा देणे गरजेचे आहे.

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या प्रवेश परीक्षेचे अर्ज भरावेत. या परीक्षेमुळे फीमध्ये सवलत मिळणार असल्याची माहिती आज केआयटीज्-आयएमईआरचे संचालक डॉ. सुजय खाडिलकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी डॉ. प्रवीण जाधव, सायबर कॉलेजच्या प्रा. मधुरा माने उपस्थित होते.

डॉ. खाडिलकर म्हणाले, ‘‘शिवाजी विद्यापीठाने ‘एमबीए’ अभ्यासक्रमामध्ये अभिनव आणि गरजेचे बदल केले आहेत. ‘एमबीए’ केलेल्या विद्यार्थ्यांना नोकरी आणि व्यवसायाच्या जगतात अमूल्य संधी मिळणार आहेत. भविष्यामध्ये कुशल मनुष्यबळाची निर्मिती आणि विकास होण्यासाठी हा अभ्यासक्रम अतिशय उपयुक्त असा तयार केला आहे.’’

‘एमबीए’ला प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी या वर्षीपासून मार्केटिंग, ह्यूमन रिसोर्स, फायनान्स, ऑपरेशन्स्, सिस्टीम्स, ॲग्री बिझिनेस, इंटरनॅशनल बिझिनेस, आंत्र्यप्रुनरशिप, हॉस्पिटॅलिटी या विविध विषयांपैकी दोन विषय घेऊन एमबीए करू शकतात. या वर्षीपासून एमबीएच्या अभ्यासक्रमामध्ये प्रात्यक्षिके आणि चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम सुरू होणार आहे. प्रवेश परीक्षा ९ आणि १० मार्च २०१९ रोजी होणार असून, या परीक्षेसाठीचे अर्ज भरण्याची अंतिम मुदत १५ फेब्रुवारी असल्याचेही ते म्हणाले.

Kolhapur, Kolhapur-Today
12/02/2019 Page No. 3

पुढारी

# 'एमबीए' परीक्षा अर्ज; १५ फेब्रुवारी अंतिम मुदत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'एमबीए' ९ व १० मार्च रोजी प्रवेश परीक्षा होणार असून परीक्षेसाठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत १५ फेब्रुवारी आहे. अशी माहिती इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एज्युकेशन अँड रिसर्चचे प्रा.डॉ. सुजय खाडीलकर यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाने 'एमबीए' अभ्यासक्रमामध्ये अभिनव आणि गरजेचे बदल केले आहेत. 'एमबीए'ला प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी यावर्षीपासून मार्केटिंग, फायनान्स, ऑपरेशन सिस्टीम्स, इंटरनॅशनल बिझनेस, हॉस्पिटॅलिटी विषयांपैकी दोन विषय घेऊन 'एमबीए' करू शकतात. 'एमबीए'च्या अभ्यासक्रमात प्रात्यक्षिके व चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम सुरू होणार आहे. 'एमबीए' केलेल्या विद्यार्थ्यांना नोकरी आणि व्यवसायाच्या संधी मिळणार आहेत. सायबर कॉलेज, डी. वाय पाटील कॉलेज, केआयटी कॉलेज, अशोकराव माने कॉलेज, शिवाजी विद्यापीठ, कॉमर्स कॉलेज या ठिकाणी अर्ज भरता येणार आहेत. यावेळी प्रा. मधुरा माने आणि डॉ. प्रवीण जाधव आदी उपस्थित होते.